जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे
महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र
दुरध्वनी नंबर : 022-25399553 ईमेल: nregathane@gmail.com

क्र.मग्रारोहयो/कक्ष-१/टे-५/कावि- ०१ /१८ दिनांक : ०४/०१/२०१८

## पाहिजेत
## तक्रार निवारण प्राधिकारी (Ombudsman)

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी करताना सर्व साधारण जनतेकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींचा निपटारा करणे व योजनेच्या कामात पारदर्शकता राखण्याकरीता उपाययोजना सुचविणे यासाठी महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम १९७७ च्या ( ६ ऑगस्ट, २०१४ पर्यंत सुधारित) अनुसूची -२ मधील कलम २९ नुसार ठाणे जिल्हाकरिता तक्रार निवारण प्राधिकारी(**Ombudsman**) यांची नेमणूक करावयाची आहे.

**किमान पात्रता :-**

१) उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर आसावा. उमेदवारास लोकप्रशासन/विधी/सामाजिक कार्य/ शैक्षणीक किंवा व्यवस्थापन क्षेत्रातील किमान वीस वर्षांचा अनुभव असावा. उमेदवार ठाणे जिल्हयाचा रहिवासी असावा.
२) उमेदवाराचे वय दिनांक ०१/०४/२०१८ रोजी ६६ वर्षापेक्षा जास्त नसावे.
३) उमेदवार राजकिय पक्षाशी संबंधीत नसावा.
४) उमेदवार शारीरिक दृष्टया सुदृढ तसेच जिल्हयातील अतिदुर्गम भागात दौरे , निरिक्षण करण्यास सक्षम असावा.

**कालावधी व मानधन :-**

१) या पदावरील नियुक्तीचा कार्यकाल दोन वर्षाकरिता असेल तथापि, कामगिरी समाधानकारक नसल्यास नियुक्ती रद्द करण्यात येईल.
२) त्यांचे कार्यालय संबंधित जिल्हयाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी असेल.
३) तक्रार निवारण प्राधिकारी यांना प्रती बैठक रु १०००/- या दराने (कमाल रु २०,०००/- प्रति माह या मर्यादेत ) मानधन देण्यात येईल.
४) तक्रार निवारण प्राधिकारी (**Ombudsman**)या पदाची तपशिलवार माहिती , नियुक्तीच्या अटी/ शर्ती व अर्जाचा नमुना केंद्र शासनाच्या दिनांक १६/०१/२०१४ रोजीच्या मार्गदर्शक सुचनांद्वारे निश्चित करण्यात आला असून त्याची प्रत केंद्र शासनाच्या www.nrega.nic.in या संकेतस्थळावर तसेच उपजिल्हाधिकारी (रोहयो) ठाणे यांचे कार्यालयात उपलब्ध आहे.

इच्छूक उमेदवारांनी स्वत:ची शैक्षणीक अर्हता व अनुभवासंबंधीच्या प्रमाणपत्रांसह जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक , ठाणे यांच्या नांवाने अर्ज तयार करावा व सदर अर्ज उपजिल्हाधिकारी (रोहयो) ठाणे , जिल्हाधिकारी कार्यालय, (रोजगार हमी योजना) शाखा तिसरा मजला, रुम नं-३१,कोर्ट नाका.ठाणे. यांचे कार्यालयात दिनांक ०६/०१/२०१८ पासून दिनांक २२/०१/२०१८ पर्यत सायं ५.३० पर्यंत सादर करावा. उशिराने प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

उपजिल्हाधिकारी (रोहयो) ठाणे कार्यालयात प्राप्त झालेल्या अर्जाची नामांकने मुळ कागदपत्रांसह खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे शासनास सादर करण्यात येतील.

| अ.क्र. | विहित नमुन्यात अर्ज | अंतिम दिनांक |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी कार्यालयाने अर्जाची प्राथमिक छाननी करण्याचा दिनांक | दिनांक ०६/०१/२०१८ ते दिनांक २२/०१/२०१८ |
| २ | जिल्हाधिकारी यांनी उमेदवारांची यादी शासनाकडे सादर करण्याचा अंतिम दिनांक | माहे जानेवारी २०१८ चा चौथा आठवडा |

दिनांक :- ०४/०१/२०१८
ठिकाण :- ठाणे

सही/-
जिल्हाधिकारी तथा
जिल्हा कार्यक्रम समन्वयक
(मगांराग्रारोहयो) ठाणे